# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३८१/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| डॉ. वैशाली पंकज वीर, रा. गुरुकृपा अभ्यासिका, रामकृष्ण नगर, १ ला मजला, ई विंग, पोर्णिमा टॉकीज कंपाऊंड, मारुती शोरुमच्या बाजुला, सिंडीगेट, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे- ४२१३०१. | अधिक्षक (साराशे वर्ग-२), शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, त्र्यंबक नाका, नाशिक, ता. जि. नाशिक- ४२२००१. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, त्र्यंबक नाका, नाशिक, ता.जि.नाशिक-४२२००१. |

**सुनावणी दिनांक — १५/०१/२०२५**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती नाकारली नाही. व प्रथम अपीलीय यांनी प्रथम अपिलाची सुनावणी केली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०१/११/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/११/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २०१० ते २०२१

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** सुर्या शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ सटाणा संचलित.

१. जनता विद्यालय नांदुरी, ता. कळवण, (इ. ८ वी ते इ. १० वी),
२. माध्यमिक विद्यालय कळवण, ता. कळवण (इ. ५ वी ते इ. १० वी),
३. सौ. वत्सलाबाई त्र्यंबकराव आहेर माध्यमिक देसगाव, ता. कळवण, जि. नाशिक (इ. ८ वी ते इ. १० वी)

ह्या वरीलप्रमाणे ०३ शाळेत इ ८ वी चे वर्ग सुरु आहे. त्यानुसार नमुना दोन RTE Act मान्यता संदर्भात.

१) वरील ०३ शाळेनी RTE मान्यता मिळण्यासाठी सादर केलेली प्रस्ताव सत्यप्रती (नमुना दोन)
२) RTE मान्यता मिळण्यासाठी गटशिक्षण अधिकारी क्षेत्रीय अधिकारी यांनी तपासणी केलेल्या /शिफारस केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रत (नमुना दोन साठी )
३) वरील ०३ शाळेच्या RTE Act नमुना दोन मान्यता तीन वर्षानुसार दिलेल्या व जुन्या व सुधारीत RTE मान्यतेच्या / आदेशाच्या प्रती (नमुना दोन RTE Act) नुसार).

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे सा. प्र.वि. परिपत्रक दि. १७/१०/२०१४ मध्ये नमूद केल्यानुसार आपणांस सदरहु माहिती देता येत नाही, असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येते.

४. **प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | १८/१२/२०२१ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०/१२/२०२१ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | माहिती उपलब्ध करुन दिली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २८/०३/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये अपिलार्थी डॉ. वैशाली पंकज वीर प्रशांत गार्डन मु. पो. आगसखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक यांचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक ०१/११/२०२१ चे अर्जानुसार मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (सारासे वर्ग-२) शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद नाशिक यांनी १५ दिवसाचे आत विनामुल्य समक्ष/रजि. पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने यांनी दि. ०३/१२/२०२१ च्या पत्रान्वये सदरची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने माहिती देता येणार नाही, अशी वस्तुस्थिती कळविलेली आहे. तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४/०४/२०२२ च्या पत्रान्वये एकुण १ ते ३७ पानांची माहिती पुरविण्यात आलेली आहे.

६. **निष्कर्ष** —

१. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहिती अर्जामध्ये माहितीचा कालावधी२०१० ते २०२१ असा नमुद केलेला असून विशिष्ट दिनांक नमूद केलेला नसल्याने माहितीचा अर्ज मोघम होत आहे.तसेच मागणी केलेली माहिती एकापेक्षा जास्त विषयाची होत असल्याचे दिसून येते.

२. अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३/१२/२०२१ च्या पत्रान्वये सदरची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने माहिती देता येणार नाही, अशी वस्तुस्थिती कळविल्याचे दिसून येते.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रथम अपिल अर्जावर दि. २८/०३/२०२२ रोजी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४/०४/२०२२ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिलेली असल्याचे दिसून येते.

४. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून येते.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक. १३८१/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

30 JUN 2025

**जावक क्र.** ४८३०